SAMPLE CONTENT

Perfect Notes

# मराठी सुलभभारती

Build Powerful Concepts



इयत्ता सहावी

(Eng. Med.)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्‌वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

## इयत्ता सहावी

# मराठी सुलभभारती




Printed at: **Print Vision,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 13032**

P.O. No. 145119

SAMPLE CONTENT

# प्रस्तावना

नमस्कार,

शिक्षण मंडळाने नियोजित केलेला इयत्ता ६ वी 'सुलभभारती'चा अभ्यासक्रम पूर्वीच्या तुलनेत फार कल्पक व मुलांच्या संकल्पना अधिक स्पष्ट करणारा आहे. याच CCE अभ्यासपद्धतीवर आधारित **टार्गेट प्रकाशनाचे इयत्ता ६ वी सुलभभारती** हे पुस्तक मुलांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

या पुस्तकात प्रत्येक पाठाचे संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन असे विभाजन केले आहे. संकलित मूल्यमापनातील प्रश्नप्रकारांमुळे पाठाचे आकलन सहजसोपे होईल. आकारिक मूल्यमापनातील वैविध्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारे ठरतील अशी आम्हाला खात्री आहे. विद्यार्थ्यांना पाठ, कविता समजून घेणे सोपे व्हावे यासाठी सर्व पाठांचा सारांश, कवितांचा भावार्थ इंग्रजीतून दिला आहे. तसेच शब्दार्थ, वाक्प्रचारांचाही इंग्रजीतून अर्थ दिला आहे. प्रत्येक पाठाच्या शेवटी व्याकरणाच्या सरावासाठी व्याकरणावर आधारित अधिक प्रश्नांचा समावेश केला आहे.

व्याकरणातील विविध संकल्पना समजून घेणे विद्यार्थ्यांना सहजसोपे व्हावे, म्हणून स्वतंत्र व्याकरण विभाग तर लेखनप्रकारांच्या सरावासाठी स्वतंत्र लेखन विभागाचाही यात समावेश केला गेला आहे.

अभ्यास करताना आपली तयारी जोखणेही महत्त्वाचे असते. त्यामुळे पाठांवर आधारित सराव प्रश्नपत्रिकाही यात अंतर्भूत केल्या आहेत. विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापनासाठी या प्रश्नपत्रिका साहाय्यकारी ठरतील. मुलांना मराठीची गोडी लावण्यात हे पुस्तक यशस्वी झाले तर आमचे प्रयत्न सार्थकी लागल्याचे समाधान मिळेल.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी यात काही कमतरता असल्यास आपल्या सूचना नेहमीच स्वागतार्ह आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरिता आपला अभिप्राय आम्हांला पुढील ईमेल पत्त्यावर पाठवावा: mail@targetpublications.org

अभिनव अभ्यासासाठी मुलांना खूप खूप शुभेच्छा!

प्रकाशक

**आवृत्ती:** द्वितीय

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textual contents published by Bureau of Textbook. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| अ.क्र | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारतमाता (गाणे) | शांता शेळके | १ |
| २. | माझा अनुभव | - | ४ |
| ३. | पाऊस आला! पाऊस आला! (कविता) | विंदा करंदीकर | ११ |
| ४. | माहिती घेऊया | - | १६ |
| ५. | सुगरणीचे घरटे | - | २२ |
| ६. | हे खरे खरे व्हावे.... (कविता) | सुमती पवार | २८ |
| ७. | उद्यानात भेटलेला विद्यार्थी | डॉ. प्रदीप आगलावे | ३४ |
| ८. | कुंदाचे साहस | - | ४१ |
| ९. | घर (कविता) | धुंडिराज जोशी | ४७ |
| १०. | बाबांचं पत्र | एकनाथ आव्हाड | ५६ |
| ११. | मिनूचा जलप्रवास | विनया साठे | ६२ |
| १२. | चंद्रावरची शाळा (कविता) | चारुता पेंढरकर | ६७ |
| १३. | मोठी आई | मालतीबाई दांडेकर | ७१ |
| १४. | अप्पाजींचे चातुर्य | विलास गिते | ७८ |
| १५. | होळी आली होळी (कविता) | दिलीप पाटील | ८५ |
| १६. | मुक्या प्राण्यांची कैफियत | ज्योती वैद्य-शेटे | ९० |
| १७. | पाणपोई (कविता) | अय्युब पठाण लोहगावकर | ९९ |
| | आपण हे करूया! | - | १०४ |
| | शब्दकोश | | १०७ |
| | शब्दकोडे | | १०८ |
| | **व्याकरण विभाग** | | १०९ |
| | **लेखन विभाग** | | |
| १. | निबंधलेखन | | ११६ |
| २. | पत्रलेखन | | १२१ |
| ३. | कथालेखन | | १२५ |
| ४. | सूचनाफलक | | १२९ |
| ५. | गद्य आकलन | | १३० |
| | सराव प्रश्नपत्रिका -१ | | १३३ |
| | सराव प्रश्नपत्रिका -२ | | १३५ |
| | सराव प्रश्नपत्रिका -३ | | १३७ |
| | सराव प्रश्नपत्रिका -४ | | १३९ |


टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शविले आहेत.

पाठाखालील व्याकरण • या चिन्हाने दर्शविले आहे.

SAMPLE CONTENT

# ७. उद्यानात भेटलेला विद्यार्थी

**लेखक – डॉ. प्रदीप आगलावे**


**Summary:**

In the lesson 'उद्यानात भेटलेला विद्यार्थी', the Writer Dr. Pradip Aaglave narrates an incidence wherein Krishnaji Arjun Keluskar met young Bhimrao Ambedkar in a garden in Mumbai. He observed that the child was interested in reading. He guided the young boy and encouraged his reading habit by offering him good books. He also recommended Sayajirao Gaikwad Maharaj to support the boy for his higher education. This young boy achieved great success in future and we all know him as Dr. Babasaheb Ambedkar. Dr. Babasaheb Ambedkar is regarded as the chief architect of the Indian constitution.


## शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| अभेद्य | तुटणार नाही अशी (unbreakable) | मार्गदर्शन | रस्ता दाखवणे, दिशा दाखवणे (guidance) |
| अवांतर | पाठ्यपुस्तकांच्या बाहेरचे (extra curricular) | मायेने | प्रेमाने (lovingly) |
| आतुर | अधीर, उत्सुक (very eager) | राज्यघटना | संविधान (या नियमांनुसार देश चालतो) (constitution) |
| उद्यान | बगीचा (garden) | विद्वान | ज्ञानी (scholar) |
| गट्टी | घट्ट मैत्री (friendship) | विद्याविभूषित | खूप विद्या प्राप्त केलेला (highly educated) |
| गृहस्थ | (gentleman) | विद्याव्यासंगी | विद्या मिळवण्याची खूप आवड असलेला (studious / scholastic) |
| तल्लख | तीक्ष्ण, कुशाग्र (extremely intelligent) | विस्तृत वाचन | अफाट वाचन (extensive reading) |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | | | |
|---|---|---|---|
| कुतूहल निर्माण होणे. | जिज्ञासा निर्माण होणे. (to be curious) | शिफारस करणे. | एखादी गोष्ट / व्यक्तीचे नाव सुचवणे. (to recommend) |
| नावलौकिक प्राप्त करणे. | प्रसिद्ध होणे. (to become renowned) | संधीचे सोने करणे. | मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन यश मिळवणे. (to make the best of an opportunity) |

## संकलित मूल्यमापन (Summative Assessment)

### पाठाधारित प्रश्नोत्तरे (Questions Based on lesson)

**प्र.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i.

१ ← **कृष्णाजी अर्जुन केळूस्कर यांची ओळख** → २

**उत्तर:** १. मुंबई येथील विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक  २. विद्याव्यासंगी लेखक

SAMPLE CONTENT

ii. १ ← **केळूस्कर गुरुजींच्या मते, भीमरावाची खरी गरज** → २

**उत्तर:** १. आपुलकी २. मार्गदर्शन

iii. १ ← **सयाजीराव गायकवाड महाराजांमुळे भीमरावांना मिळालेल्या शैक्षणिक संधी** → २

**उत्तर:** १. महाविद्यालयीन शिक्षण २. उच्च शिक्षण

iv. १ ← **यांची अभेद्य गट्टी जमली होती** → २

**उत्तर:** १. केळूस्कर गुरुजी २. भीमराव

***प्र.२. पाठातील खालील घटना योग्य क्रमाने लिहा.**

i. गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.
ii. गुरुजींनी विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही.
iii. त्या विद्यार्थ्यानेदेखील गुरुजींकडे बघितले.
iv. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.
v. गुरुजींनी भीमरावला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.
vi. गुरुजी मुलाजवळ आले.

**उत्तर:** i. गुरुजींनी विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही.
ii. त्या विद्यार्थ्यानेदेखील गुरुजींकडे बघितले.
iii. गुरुजी मुलाजवळ आले.
iv. गुरुजींनी भीमरावला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.
v. गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.
vi. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.

***प्र.३. खालील वाक्ये कोण, कोणास व का म्हणाले ते लिहा.**

i. "बाळ तुझं नाव काय?"
ii. "चांगली पुस्तके वाचली पाहिजेत."
iii. "मला ती पुस्तके वाचायला आवडतील!"

**उत्तर:** i. कृष्णाजी अर्जुन केळूस्कर उद्यानातील विद्यार्थ्यास म्हणाले कारण गुरुजींना त्याच्याशी ओळख करून घ्यायची होती.
ii. केळूस्कर गुरुजी भीमरावला म्हणाले कारण भीमरावला अवांतर वाचनाची आवड आहे हे त्याने गुरुजींना सांगितले.
iii. भीमराव गुरुजींना म्हणाला कारण गुरुजींनी भीमरावला काही लेखकांची पुस्तके देईन असे सांगितले.

**प्र.४. कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

i. उद्यानात सायंकाळी अनेक ................ फिरायला यायचे. (लोक / नागरिक / मुले)
ii. इतर मुलांसारखी तू ................ करताना दिसत नाहीस. (चोरी / दांडगाई / मस्ती)
iii. नंतर केळूस्कर गुरुजींनी भीमरावच्या ................ चौकशी केली. (कुटुंबाविषयी / अभ्यासाविषयी / शाळेविषयी)
iv. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची ................ लिहिली. (राज्यघटना / सूत्रे / नियमावली)

**उत्तर:** i. उद्यानात सायंकाळी अनेक **नागरिक** फिरायला यायचे.
ii. इतर मुलांसारखी तू **मस्ती** करताना दिसत नाहीस.
iii. नंतर केळूस्कर गुरुजींनी भीमरावच्या **कुटुंबाविषयी** चौकशी केली.
iv. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची **राज्यघटना** लिहिली.

SAMPLE CONTENT

**प्र.५. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

i. **कृष्णाजी अर्जुन केळूस्कर कोण होते?**

**उत्तर:** कृष्णाजी अर्जुन केळूस्कर हे मुंबई येथील विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक होते व विद्याव्यासंगी लेखक होते.

*ii. **चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी कशासाठी येत?**

**उत्तर:** चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी बाकावर बसून पुस्तक वाचण्यासाठी येत.

*iii. **उद्यानात गुरुजींचे कोणाकडे लक्ष गेले?**

**उत्तर:** उद्यानात गुरुजींचे लक्ष थोड्या अंतरावर बसून पुस्तक वाचणाऱ्या विद्यार्थ्याकडे गेले.

*iv. **गुरुजींना उद्यानात वाचन करत बसलेल्या विद्यार्थ्याची विचारपूस करावी असे का वाटले?**

**उत्तर:** गुरुजींना उद्यानात एक विद्यार्थी सलग तीन दिवस वाचन करत बसलेला दिसला. तो इतर मुलांसारखी मस्ती करताना दिसत नसे, म्हणून गुरुजींना त्याची विचारपूस करावी असे वाटले.

v. **भीमराव कोठे शिकत होता?**

**उत्तर:** भीमराव भायखळा येथील एलफिन्स्टन हायस्कूल या शाळेत शिकत होता.

vi. **भीमरावला कशाची खरी गरज आहे असे गुरुजींना वाटले?**

**उत्तर:** भीमरावला आपुलकी आणि मार्गदर्शनाची खरी गरज आहे असे गुरुजींना वाटले.

vii. **गुरुजींनी भीमरावला काय सांगायचे ठरवले?**

**उत्तर:** गुरुजींनी भीमरावला पद्धतशीरपणे वाचन कसे करायचे ते सांगायचे ठरवले.

*viii. **केळूस्कर गुरुजींची व डॉ. आंबेडकरांची गट्टी का जमली?**

**उत्तर:** केळूस्कर गुरुजी व डॉ. आंबेडकर यांची रोज उद्यानात भेट होऊ लागली. गुरुजी त्यांना चांगल्या लेखकांची पुस्तके वाचायला देऊ लागले, त्यामुळे दोघांची गट्टी जमली.

*ix. **डॉ. आंबेडकरांनी कोणता नावलौकिक मिळवला?**

**उत्तर:** डॉ. आंबेडकरांनी मिळालेल्या उच्च शिक्षणाच्या संधीचे सोने करून, उच्चविद्याविभूषित होऊन, जगातील एक विद्वान म्हणून नावलौकिक मिळवला.

***प्र.६. असे का घडले? ते लिहा.**

i. केळूस्कर गुरुजींच्या मनात उद्यानात वाचत बसलेल्या विद्यार्थ्याबाबत कुतूहल निर्माण झाले.
ii. भीमराव उद्यानात वाचत बसायचे.
iii. गुरुजींनी भीमरावच्या डोक्यावरून हात फिरवला.
iv. गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.
v. गुरुजींनी भीमरावच्या उच्च शिक्षणासाठी शिफारस केली.

**उत्तर:** i. चर्नी रोड उद्यानात वाचन करत असताना एके दिवशी केळूस्कर गुरुजींच्या लक्षात आले, की थोड्या अंतरावर एक विद्यार्थी पुस्तक वाचत बसला आहे. त्यावेळी त्यांनी या विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही. दुसऱ्या दिवशी तोच विद्यार्थी पुन्हा पुस्तक वाचताना दिसला त्यामुळे केळूस्कर गुरुजींच्या मनात त्या विद्यार्थ्याबाबत कुतूहल निर्माण झाले.

ii. भीमरावला शाळेतील पुस्तकांशिवाय अवांतर पुस्तके वाचण्याची आवड होती. त्यामुळे, तो शाळा सुटल्यानंतर काही काळ उद्यानात वाचत बसायचा.

iii. गुरुजी भीमरावला म्हणाले, “मी काही लेखकांची पुस्तके तुला वाचायला देईन.” त्यावर भीमरावने ती पुस्तके आपल्याला वाचायला आवडेल असे सांगितले. भीमरावला वाचनाविषयी असलेले प्रेम पाहून गुरुजींनी त्याच्या डोक्यावरून हात फिरवला.

SAMPLE CONTENT

iv. चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी व भीमरावची रोज भेट होऊ लागली. भीमरावची वाचनाची आवड पाहून गुरुजी भीमरावला चांगल्या लेखकांची पुस्तके देऊ लागले. त्यामुळे, भीमरावचे वाचन विस्तृत व्हायला सुरुवात झाली. यामुळे, केळूस्कर गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

v. भीमराव बुद्धीने तल्लख होता त्यामुळे केळूस्कर गुरुजींनी त्याला महाविद्यालयीन आणि पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवण्यासाठी सयाजीराव गायकवाड महाराजांकडे शिफारस केली.

## मुक्तोत्तरी प्रश्न (Open Ended Questions)

**प्र.१. तुम्हांला पुस्तके वाचायला आवडते का?**

**उत्तर:** हो, मला गोष्टींची पुस्तके वाचायला खूप आवडते. माझी आई मला ग्रंथालयातून बोधकथा, रहस्यकथा, काल्पनिक कथा अशी विविध प्रकारची पुस्तके आणून देते. त्यांचे वाचन करताना त्यात मी इतकी गुंग होते, की आईची हाकही मला ऐकू येत नाही. त्या अनोख्या विश्वात मी हरवून जाते. बोधकथेतून मिळणारा बोध किंवा रहस्यकथेतील रहस्य जाणून घेताना मनाला वेगळाच आनंद मिळतो. यामुळे, एकाग्रता तर वाढतेच शिवाय माहितीसोबत मनोरंजनही होते. 'वाचाल तर वाचाल' या सुविचाराची ओळख पटते.

## शब्दज्ञान व व्याकरण (Vocabulary and Grammar)

**प्र.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. सुरुवात = | ii. प्रेम = | iii. आवड = | iv. आतुर = |
| v. विस्तृत = | vi. बुद्धी = | vii. सोने = | viii. तल्लख = |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. प्रारंभ | ii. स्नेह | iii. पसंत | iv. उत्सुक |
| v. अफाट, विस्तीर्ण | vi. मती, प्रज्ञा | vii. सुवर्ण, कनक | viii. तीक्ष्ण |

**प्र.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. सायंकाळ × | ii. आवड × | iii. बरे × | iv. सुरुवात × |
| v. प्रेम × | vi. दिवस × | vii. स्वतंत्र × | |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. सकाळ | ii. नावड | iii. वाईट | iv. शेवट |
| v. द्वेष | vi. रात्र | vii. परतंत्र | |

**प्र.३. लिंग बदला.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| i. लेखक | ii. विद्यार्थी | iii. मुलगा | iv. विद्वान | v. मुख्याध्यापक |
| **उत्तर:** i. लेखिका | ii. विद्यार्थिनी | iii. मुलगी | iv. विदुषी | v. मुख्याध्यापिका |

***प्र.४. खालील शब्दांचे वचन बदला.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. लेखक | ii. पुस्तक | iii. शाळा | iv. भेट |
| v. शिफारस | vi. शब्द | | |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. लेखक | ii. पुस्तके | iii. शाळा | iv. भेटी |
| v. शिफारशी | vi. शब्द | | |

***प्र.५. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा.**

उदा. वाचनाला - वाच, नाच, नाला, लावा, चला.

i. तुझ्याजवळ   ii. दिवसापासून   iii. मार्गदर्शन   iv. आवडतील

**उत्तर:**
i. तुझ्याजवळ - जवळ, जव, जळ, वळ, तुझ्या, तुज
ii. दिवसापासून - दिसून, दिन, वसा, वन, सासू, पाव, पान, सून, पासून, नव
iii. मार्गदर्शन - मार्ग, दर्शन, मान, दमा
iv. आवडतील - आवड, आव, आड, आतील, वड, लव

SAMPLE CONTENT

***प्र.६. खालील शब्द असेच लिहा.**

उद्यान, हायस्कूल, मुख्याध्यापक, विद्याव्यासंगी, विद्यार्थी, तिसऱ्या, दुसऱ्या, सर्वसामान्य, निश्चित, मार्गदर्शन, पद्धतशीर, विस्तृत, अभेद्य, गट्टी, तल्लख, बुद्धिमत्ता, महाविद्यालयीन, शिक्षण, स्वत:, विद्वान, प्राप्त, व्रात्य, विद्याविभूषित, उच्च, स्वतंत्र.

**प्र.७. खालील वाक्यांत कंसातील योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

( . , ! ‘ ’ “ ” )

i. त्यांनी विचारले बाळ तुझं नाव काय

ii. आपल्याविषयी प्रेमाने स्नेहाने बोलणाऱ्या त्या गृहस्थांबद्दल भीमरावला आदर वाटला

iii. भीमरावला खूप बरे वाटले

**उत्तर:** i. त्यांनी विचारले, “बाळ तुझं नाव काय?”

ii. आपल्याविषयी प्रेमाने, स्नेहाने बोलणाऱ्या त्या गृहस्थांबद्दल भीमरावला आदर वाटला.

iii. भीमरावला खूप बरे वाटले.

**प्र.८. नाम व विशेषणांच्या जोड्या जुळवा.**

| | नाम | | विशेषणे |
|---|---|---|---|
| i. | लेखक | अ. | चांगली |
| ii. | पुस्तके | ब. | तल्लख |
| iii. | वाचन | क. | अभेद्य |
| iv. | गट्टी | ड. | महाविद्यालयीन |
| v. | बुद्धिमत्ता | ई. | विद्याव्यासंगी |
| vi. | शिक्षण | फ. | पद्धतशीर |

**उत्तर:** (i – ई), (ii – अ), (iii – फ), (iv – क), (v – ब), (vi – ड)

**प्र.९. खालील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा.**

i. मधू तूप-साखर खातो.

ii. मासा पाण्यात राहतो.

iii. आम्ही खूप थकलो.

iv. डोंगराच्या माथ्यावरून मी खालचे सुंदर दृश्य पाहिले.

v. सुट्टीत रंजना पुस्तकं वाचते.

vi. मी अंधाराला घाबरतो.

**उत्तर:** i. मधू तूप-साखर खातो.

ii. मासा पाण्यात राहतो.

iii. आम्ही खूप थकलो.

iv. डोंगराच्या माथ्यावरून मी खालचे सुंदर दृश्य पाहिले.

v. सुट्टीत रंजना पुस्तकं वाचते.

vi. मी अंधाराला घाबरतो.

**प्र.१०. खालील वाक्यांतील काळ ओळखा.**

i. चर्नी रोड उद्यानात सायंकाळी अनेक लोक फिरायला येतात.

ii. आता मात्र त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले.

iii. मी काही लेखकांची पुस्तके तुला वाचायला देईन.

**उत्तर:** i. वर्तमानकाळ ii. भूतकाळ iii. भविष्यकाळ

**प्र.११. वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या जुळवा.**

| | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| i. | संधीचे सोने करणे. | अ. | प्रसिद्ध होणे. |
| ii. | नावलौकिक प्राप्त करणे. | ब. | एखाद्या व्यक्तीचे नाव सुचवणे. |
| iii. | कुतूहल निर्माण होणे. | क. | जिज्ञासा निर्माण होणे. |
| iv. | शिफारस करणे. | ड. | मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन यश मिळवणे. |

**उत्तर:** (i – ड), (ii – अ), (iii – क), (iv – ब)

SAMPLE CONTENT

## आकारिक मूल्यमापन (Formative Assessment)

**प्र.१. खालील शब्द शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

*i. शब्द : सुशब्द (good word), अपशब्द (bad word)
*ii. स्पष्ट : सुस्पष्ट (very much clear), अस्पष्ट (unclear)
*iii. बुद्धी : सुबुद्धी (good sense), बुद्धिमत्ता (intelligence), बुद्धिमान (intelligent), निर्बुद्ध (stupid), दुर्बुद्धी
iv. प्रसिद्ध : सुप्रसिद्ध (famous), कुप्रसिद्ध (ill- famed)
v. जय : विजय (victory), पराजय (failure)
vi. राज्य : सुराज्य (good rule), स्वराज्य (independence of a country or state)

***प्र.२.सांगा पाहू.**

* i.
कधी हातावर, कधी भिंतीवर
जाऊन मी बसतो,
तीन हात माझे सतत
फिरवत मी असतो,
वेळ वाया घालवू नका
असा नेहमी उपदेश करतो.

* ii.
शिस्तीचे धडे
उत्तम गडे,
कणकण शोधते कधीच न रडे.

iii.
तीनरंगी अंग माझे
देशाचा मी आहे मान
फडकत राहीन लाल किल्ल्यावर
वाढवीन देशाची शान

iv.
रोज तुम्ही उठता,
बसता-खेळता माझ्या अंगावर
माझ्यात पिकवता शेती भाती,
भार सारा माझ्यावर
मी आहे माता तुमची,
प्रेम माझे तुमच्यावर!

v.
रंग माझा काळा
नाही गोड गळा
मला पाहताच लोक
म्हणती इथे का-वळा?

vi.
उंच विहरतो आभाळात
माझी दोरी तुमच्या हातात
वाऱ्यांसंगे मैत्री माझी
आभाळाशी दोस्ती माझी

**उत्तर:** i. घड्याळ ii. मुंगी iii. तिरंगा झेंडा iv. जमीन
v. कावळा vi. पतंग

***प्र.३. आंतरजालावरून खालील मुद्द्यांच्या आधारे डॉ. आंबेडकर यांची माहिती मिळवा व लिहा.**

i. पूर्ण नाव ii. जन्म स्थळ iii. जन्म दिनांक iv. आई-वडिलांचे नाव
v. शिक्षण vi. लिहिलेली पुस्तके vii. कार्य

**उत्तर:** i. **पूर्ण नाव :**
डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

ii. **जन्म स्थळ :**
महू, इंदूर जिल्हा, मध्य प्रदेश.

iii. **जन्म दिनांक :**
१४ एप्रिल १८९१

iv. **आई-वडिलांचे नाव :**
आई - भीमाबाई रामजी सकपाळ
वडील - सुभेदार रामजी मालोजी सकपाळ

SAMPLE CONTENT

v. **शिक्षण :**
बी.ए, एम.ए, पी.एचडी., एम. एससी., डी.एससी, बॅरिस्टर.ॲट.लॉ, एल.एल.डी. डी.लिट. (अशा एकूण ३२ पदव्या)

vi. **लिहिलेली पुस्तके :**
'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', 'जातिप्रथेचे विध्वंसन', 'हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान', 'शूद्र पूर्वी कोण होते?' इ.

vii. **कार्य :**
समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित, राजकारणी, मानववंशशास्त्रज्ञ, घटनाशास्त्रज्ञ, पत्रकार, इतिहासकार, शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, लेखक, मानवी हक्कांचे कैवारी, समाजसुधारक इत्यादी विविध रूपांमध्ये समाजोपयोगी कार्य त्यांनी सातत्याने केले.
त्यातील 'भारतीय घटनेचे लेखन' हे त्यांचे महत्त्वाचे कार्य मानले जाते.

## उपक्रम (Activity)

***प्र.१. वेगवेगळ्या वृत्तपत्रांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आलेल्या माहितीची कात्रणे गोळा करा व वहीत चिकटवा. त्याचे वाचन करा.**
(वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: सोडवावा.)

**प्र.२. खालील व्यक्तींशी तुम्ही बोलत आहात अशी कल्पना करून पाच-सहा ओळींचे संवादलेखन करा.**






**उदाहरणादाखल:**



**तुम्ही** : अरे दादा, अभिनंदन! तुला दहावीला छान गुण मिळाल्याचे समजले.
**पेपरवाला** : धन्यवाद.
**तुम्ही** : अरे, तू तुझं काम सांभाळून एवढा अभ्यास केलास तरी कधी?
**पेपरवाला** : मी रोज पहाटे उठून पेपर टाकायचो. त्यानंतर घरी जाऊन अभ्यासाला लागायचो.
**तुम्ही** : आणि शाळा?
**पेपरवाला** : दुपारी शाळेत जायचो. पुन्हा रात्री अभ्यास करायचो.
**तुम्ही** : किती मेहनत करतोस तू! मला तुझं खूप कौतुक वाटतं.

SAMPLE CONTENT

# Std. VI




## AVAILABLE SUBJECTS:

- English Balbharati
- हिंदी सुलभभारती
- मराठी सुलभभारती
- Mathematics
- General Science
- History - Civics & Geography

BUY NOW

## SALIENT FEATURES:

- Based on the latest syllabus of Maharashtra State Board
- Glossary, Paraphrases and Summaries are provided for every chapter in Languages
- Activity based questions that widen the knowledge spectrum are provided
- Chapter wise Assignment Tests in Maths, Social Sciences & General Science facilitate thorough revision
- Model Test Papers are provided in languages (English, Hindi, Marathi) to help students assess themselves

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15
mail@targetpublications.org
www.targetpublications.org